शिक्षा अंतिम करणे बाबत (श्री नितीन शेषराव गिरी, ग्रामसेवक ग्रामपंचायत-सांडवे, ता.अहिल्यानगर)

जिल्हा परिषद अहिल्यानगर

ग्रामपंचायत विभाग

आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/२८४/२०२६

दिनांक - स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

संदर्भः- १ या कार्यालयाकडील आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/२२३/२०२४,दि.१६/०५/२०२४. (सेवा निलंबन आदेश)

२. या कार्यालयाकडील ज्ञापन क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/२२२/२०२४ दि.१६/०५/२०२४

३.या कार्यालयाकडील विभागीय चौकशी नियुक्तीचे आदेश क्र. साप्रवि- २/ग्रापं-३/ ई.क्र., दिनांक- २०/०८/२०२४

४. सहा.आयुक्त (चौकशी), नाशिक यांचेकडील चौकशी अहवाल क्र. विशा.४/खाचौ/सी. आर.१०६ /२०२४, दिनांक- १७/१०/२०२५

५.या कार्यालयाची अंतिम कारणे दाखवा नोटीस क्र.ग्रापं-३/३५/२०२६/७६४५९३८ दि.१२/०३/२०२६.

६. श्री नितीन शेषराव गिरी,ग्रामपंचायत अधिकारी यांचा खुलासा दि.१०.०४.२०२६.

७.महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) १९६४ मधील नियम ४ (४)

संदर्भ क्रमांक २ अन्वये, श्री नितीन शेषराव गिरी, ग्रामसेवक ग्रामपंचायत-सांडवे, ता.अहिल्यानगर त्यांनी ग्रामपंचायत कार्यालयीन कामी गैरवर्तन केल्याने दोषारोपपत्र बजावणेत आले होते. संदर्भ क्रमांक ३ नुसार श्री नितीन शेषराव गिरी, ग्रामसेवक ग्रामपंचायत-सांडवे, ता.अहिल्यानगर यांचे गैरतर्वनाविरुध्द विभागीय चौकशी सुरु करणे कामी चौकशी अधिकारी यांची नेमणुक करणेत आली होती.

संदर्भ क्रमांक.४ नुसार सहाय्यक चौकशी अधिकारी नाशिक विभाग नाशिक यांनी चौकशी पुर्ण करुन चौकशी अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे. चौकशी अहवालामध्ये पुढीलप्रमाणे आरोपांच्या चौकशीचे निष्कर्ष नोंदविणेत आलेले आहेत. श्री नितीन शेषरावं गिरी, ग्रामसेवक ग्रामपंचायत-सांडवे, ता.अहिल्यानगर यांचे वर चौकशी करण्यात आलेल्या ०४ दोषारोपांपैकी ०४ आरोप सिध्द झाले आहेत.

विभागीय चौकशी नियम पुस्तिका चौथी आवृत्ती १९९१ मधील प्रकरण सात मधील ७.१ नुसार चौकशी अहवालास सहमती दर्शविलेली असल्याने श्री नितीन शेषराव गिरी, ग्रामसेवक ग्रामपंचायत-सांडवे, ता.अहिल्यानगर यांनी कार्यालयीन कामकाजात गैरवर्तन करुन, महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केलेला आहे. त्यामुळे त्यांना संदर्भ क्र.४ नुसार महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) १९६४ मधील नियम ४ (६) नुसार सेवेतून काढून टाकणे,ही शिक्षा अंतिम का करण्यात येऊ नये? याबाबतची अंतिम कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे. खुलासा सादर न केल्यास अंतिम कारणे दाखवा नोटीस मध्ये नमुद केलेली शिक्षा तुम्हांस मान्य आहे, असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे कळविण्यात आलेले आहे. संदर्भ क्रमांक ६ अन्वये श्री नितीन शेषराव गिरी, ग्रामसेवक ग्रामपंचायत-सांडवे, ता.अहिल्यानगर त्यांनी याप्रकरणी खुलासा सादर केलेला आहे.

श्री नितीन शेषराव गिरी, ग्रामसेवक ग्रामपंचायत-सांडवे, ता.अहिल्यानगर यांचे खुलाश्याचे अनुषंगाने श्री नितीन शेषराव गिरी, तत्कालीन ग्रामसेवक महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) १९६४ मधील नियम ४ (५) नुसार पुढील सध्याच्या पदाच्या मुळ वेतनावर आणणे. ही शिक्षा या आदेशान्वये अंतिम करण्यात येत आहे. सदर आदेशाची नोंद संबधिताच्या सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०९२४०६०९८० असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 25-09-2026 18:26:49
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत:-

१. श्री नितीन शेषराव गिरी, ग्रामसेवक ग्रामपंचायत-सांडवे, ता.अहिल्यानगर

द्वारा व प्रत- गटविकास अधिकारी, पंचायत समिती राहुरी, जि.अहिल्यानगर.

२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती,राहुरी.

२/- सदर आदेशाची नोंद संबंधिताच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

३. गटविकास अधिकारी, पंचायत समिती,अहिल्यानगर.

४. कार्यासन ग्रापं-१, ग्रामपंचायत विभाग, जि.प.अहिल्यानगर.